**MHKO**070015972022

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१६६/२०२२ मधील नि.क्र.१ वरील आदेश.**
**(श्री.रामा शंकर नेर्लेकर – विरुध्द – महाराष्ट्र सरकार )**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४५१ व ४५७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जदाराचे कथन असे की, अर्जात नमूद वाहन त्याचे वर्णन पुढीलप्रमाणे –

**अ) ट्रॅक्टरचे वर्णन** – गाडीचा नंबर MH–45–F–0120 ; चेसीस नंबर – QYCG 51618011165 ; इंजिन नंबर – 471403/SHF1050 ; मॉडेल–पंजाब ८५५ ; गाडीचा रंग–लाल पांढरा ; कंपनीचे नाव – स्वराज (पंजाब ट्रॅक्टर लि.)

**ब) ट्रेलरचे वर्णन** – गाडीचा नंबर MH–13–T–5483 ; चेसीस नंबर – 132211 ; इंजिन नंबर – NA; मॉडेल–ट्रेलर ; गाडीचा रंग–लाल आणि पिवळा.

**क) ट्रेलरचे वर्णन** – गाडीचा नंबर MH–13–T–5484 ; चेसीस नंबर – 132311 ; इंजिन नंबर – NA; मॉडेल–ट्रेलर ; गाडीचा रंग–लाल आणि पिवळा.

हे अर्जदार यांच्या मालकीचे आहेत. सदरचे वाहन शिरोळ पोलिसांनी गुन्हा नोंद क्र.०१७३/२०२२, भारतीय दंड विधान कायदा कलम ४०८ चे कामी जप्त केलेले आहे. (ज्याचा उल्लेख यापुढे संक्षिप्ताकरिता 'जप्त मुद्देमाल' असा केला आहे.) सदर जप्त मुद्देमाल अर्जदार यांना त्यांच्या कुटुंबाच्या गरजेकरीता व शेतीकरीता अत्यावश्यक आहे. सदर जप्त मुद्देमाल पोलीस ठाण्यामध्ये उघडयावर पडून असल्याने तो गंजून खराब होवून निरुपयोगी होणार आहे. त्यामुळे अर्जदाराचे फार मोठे आर्थीक नुकसान होणार आहे. सबब, जप्त मुद्देमाल अटी व शर्ती घालून सुपुर्दनाम्यावर परत करणेची विनंती केली आहे.

**०३.** तपासी अंमलदार यांनी निशाणी क्र.४ वर दाखल केले आहे. सहाय्यक

सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र.५ वर दाखल केले आहे. तपासी अंमलदार यांच्या म्हणण्यानुसार सदरचा मुद्देमाल अर्जदारास योग्य त्या अटी व शर्तींवर परत देणेस त्यांची काही हरकत नसल्याचे सांगीतले आहे. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या म्हणण्यानुसार सदरचा मुद्देमाल हा पुराव्यासाठी महत्वाचा असून तो अर्जदार यांना परत केल्यास तो मुद्देमाल अर्जदाराने विक्री केल्यास त्याचा परिणाम पुराव्यावर होणार आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

०४. अर्जदार तर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांनी निशाणी क्र.३ सोबत शिरोळ पोलीस ठाणेकडील गु.र.क्र.०१७३/२०२२ मधील प्रथम खबर अहवाल, निशाणी क्र.७ सोबत अर्जामधील नमुद वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्रांच्या तसेच निशाणी क्र.१० सोबत अर्जदाराच्या आधारकार्ड यांच्या पडताळलेल्या प्रती इ.कागदपत्रे दाखल केलेली आहेत. उपरोक्त बाबीवरुन अर्जदार हेच सदर वाहनाचे नोंदणीकृत मालक असल्याचे दिसून येते.

०५. जप्त मुद्देमाल अर्जदाराव्यतिरीक्त इतर कोणीही मागणी केलेला नाही आणि अर्जदार यांनी त्यांचा प्रथमदर्शनी मालकी हक्क दर्शविणारा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे. प्रस्तुत खटला चालण्यास बराच वेळ लागण्याची शक्यता आहे. जप्त मुद्देमाल विना वापर पोलीस ठाण्यामध्ये पडून राहिल्यास तो गंजून खराब होण्याची शक्यता आहे. अर्जदार जप्त मुद्देमालाचे नोंदणीकृत मालक असल्याने व ते त्यांच्या वापरातील असल्याने त्याचा ताबा आवश्यक त्या अटी घालुन त्यांना देणे योग्य व न्यायोचित होणार आहे. सबब वर नमूद कारणांकरिता पुढील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१) पोलीस निरीक्षक, **शिरोळ** पोलीस ठाणे यांना निर्देशीत करण्यात येते की, गुन्हा नोंद क्र.**०१७३/२०२२** चे कामी अर्जाचे परिच्छेद नं. १ मध्ये नमूद **अ) ट्रॅक्टरचे वर्णन** – गाडीचा नंबर MH–45–F–0120 ; चेसीस नंबर – QYCG 51618011165 ; इंजिन नंबर – 471403/SHF1050 ; मॉडेल–पंजाब ८५५ ; गाडीचा रंग–लाल पांढरा ; कंपनीचे नाव – स्वराज (पंजाब ट्रॅक्टर लि.), **ब) ट्रेलरचे वर्णन** – गाडीचा नंबर MH–13–T–5483 ; चेसीस नंबर – 132211 ; इंजिन नंबर – NA; मॉडेल–ट्रेलर ; गाडीचा

रंग–लाल आणि पिवळा, **क) ट्रेलरचे वर्णन** – गाडीचा नंबर MH–13–T–5484 ; चेसीस नंबर – 132311 ; इंजिन नंबर – NA; मॉडेल–ट्रेलर ; गाडीचा रंग–लाल आणि पिवळा या वाहनाचा अंतरिम ताबा अर्जदार **श्री.रामा शंकर नेर्लेकर** यांना रक्कम **रु.२०,००,०००**/–चे सुपुर्तनाम्यावर पुढील अटीवर देण्याचा आहे.

**अ)** अर्जदाराने सदर जप्त मुददेमालाचे स्वरुप बदलण्याचे नाही अगर न्यायालयाच्या परवानगीशिवाय विक्री करण्याचे नाही.

**ब)** अर्जदाराने सदर जप्त मुददेमाल **शिरोळ** पोलीस स्टेशन गुन्हा नोंद क्र.**०१७३/२०२२** चे कामी न्यायालयाचे आदेशानुसार हजर करण्याचा आहे.

**क)** सदर जप्त मुद्देमालाबाबत भविष्यात आदेश झाल्यास सदर आदेशाप्रमाणे वर्तन करण्यास अर्जदार बांधील राहतील.

**ड)** भविष्यामध्ये अर्जदाराने जप्त मुद्देमालाचा वापर कोणत्याही गुन्हयामध्ये करणेचा नाही.

२) सदरील मुददेमाल अर्जदारास देताना मुददेमालाचे चारही बाजूंचे रंगीत छायाचित्र घेण्यात यावे. सुपुर्दनामा तपासी अधिकारी यांच्यासमक्ष रु.२००/– च्या बॉण्डवर पूर्ण करावा. सदर सुपुर्दनामा अंतीम अहवालासोबत न्यायालयात दाखल करण्याचा आहे.

३) सदर आदेशाची प्रत अंमलबजावणीकरिता तपासी अंमलदार यांना पाठविण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by ROHINI ASHOK JADHAV
Date: 2022.11.14 18:32:58 +0530

(**रोहिनी अ. जाधव**)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, जयसिंगपूर.

दिनांक :– १४/११/२०२२
ठिकाण : – जयसिंगपूर.